Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 23 November 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

राज्य विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरु आहे. राज्यातल्या २८८ विधानसभा मतदारसंघांसह नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी होत आहे. सुरवातीला टपाली मतमोजणी झाली, त्यानंतर ईव्हीएमची मोजणी सुरु झाली. काही ठिकाणचे कल हाती येण्यास सुरुवात झाली आहे.

२८८ मतदारसंघातून भाजप १२५, शिवसेना ५६, राष्ट्रवादी काँग्रेस ३५, काँग्रेस २१, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष १७, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १३ जागांवर, तर इतर आणि अपक्ष उमेदवार २० जागांवर आघाडीवर आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या औरंगाबाद मध्य मतदारसंघातून महायुतीचे शिवसेनेचे प्रदीप जैस्वाल, औरंगाबाद पश्चिम मधून शिवसेनेचे संजय शिरसाट, औरंगाबाद पूर्व मधून एमआयएमचे इम्तियाज जलिल आघाडीवर आहेत.

गंगापूर मतदारसंघातून भाजपचे प्रशांत बंब, वैजापूर मधून शिवसेनेचे रमेश बोरनारे, कन्नड मधून भाजपच्या संजना जाधव, फुलंब्री मधून भाजपच्या अनुराधा चव्हाण, सिल्लोडमधून तिसर्या फेरीनंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सुरेश बनकर, तर पैठण मतदारसंघातून शिवसेनेचे विलास भुमरे आघाडीवर आहेत.

****

बीड जिल्ह्यातल्या बीड विधानसभा मतदारसंघात आठव्या फेरीनंतर महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार योगेश क्षीरसागर ५०८ मतांनी आघाडीवर आहेत. परळी मतदारसंघात महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे सातव्या फेरीनंतर ३५ हजार मतांनी आघाडीवर आहेत. आष्टी मधून दुसऱ्या फेरीनंतर भाजप महायुतीचे सुरेश धस तीन हजार ७९६ मतांनी, माजलगाव मधून आठव्या फेरीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मोहन जगताप, केज मतदारसंघातून भाजप

महायुतीच्या नमिता मुंदडा, तर गेवराई मधून तिसऱ्या फेरीनंतर महायुती राष्ट्रवादी काँग्रेसचे विजयसिंह पंडित आघाडीवर आहेत.

****

जालना जिल्ह्यातल्या बदनापूर मतदारसंघातून चौथ्या फेरीनंतर भाजप महायुतीचे नारायण कुचे तीन हजार ६०० मतांनी, जालना मतदारसंघातून शिवसेनेचे अर्जुन खोतकर, घनसावंगी मतदारसंघातून शिवसेनेचे हिकमत उढाण, तर भोकरदन मधून भाजपाचे संतोष दानवे तिसर्या फेरीअखेर तीन हजार २७८ मतांनी आघाडीवर आहेत.

****

लातूर जिल्ह्यात लातूर शहर मतदारसंघातून पहिल्या फेरीनंतर महाविकास आघाडीचे काँग्रेसचे अमित देशमुख १६७ मतांनी आघाडीवर आहेत. लातूर ग्रामीणमधून काँग्रेसचे धीरज देशमुख, अहमदपूर मतदारसंघातून जनसुराज्य पक्षाचे गणेश हाके, उदगीर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय बनसोडे, निलंग्यातून भाजपचे संभाजी पाटील निलंगेकर, तर औसा मतदारसंघातून भाजपचे अभिमन्यू पवार आघाडीवर आहेत.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या उस्मानाबाद मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कैलास घाडगे पाटील, तुळजापूर मधून भाजपचे राणा जगजितसिंह पाटील, उमरग्यातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रवीण स्वामी, तर परंडा मतदारसंघातून शिवसेनेचे तानाजी सावंत आघाडीवर आहेत.

****

नांदेड जिल्ह्यातल्या नांदेड दक्षिण मतदारसंघातून काँग्रेसचे मोहन हंबर्डे, नांदेड उत्तर मधून शिवसेनेचे बालाजी कल्याणकर, नायगाव मधून भाजपचे राजेश पवार, देगलूर मधून, मुखेड मतदारसंघातून, भोकर मधून भाजपच्या श्रीजया चव्हाण, लोहा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रताप पाटील चिखलीकर, किनवट मधून भाजपचे भीमराव केराम, तर हदगाव मतदारसंघातून शिवसेनेचे बाबुराव कदम कोहळीकर आघाडीवर आहेत.

नांदेड लोकसभा मतदरासंघाच्या पोटनिवडणुकीत काँग्रेसचे रविंद्र चव्हाण आघाडीवर आहेत.

****

हिंगोली जिल्ह्यात वसमत मतदारसंघातून पाचव्या फेरीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे राजु नवघरे, हिंगोली मधून भाजपचे तानाजी मुटकुळे, तर कळमनुरी मतदारसंघातून शिवसेनेचे संतोष बांगर आघाडीवर आहेत.

****

परभणी जिल्ह्यातल्या परभणी मतदारसंघातून शिवसेनेचे आनंद भरोसे, गंगाखेड मधून शिवसेनेचे विशाल कदम, पाथरी मधून काँग्रेसचे सुरेश वरपुडकर, तर जिंतूर मतदारसंघातून भाजपच्या मेघना बोर्डीकर आघाडीवर आहेत.

****

ठाणे जिल्ह्यातल्या कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातून शिवसेनेचे एकनाथ शिंदे, नागपूर दक्षिण - पश्चिम विधानसभा मतदार संघातून भाजपचे देवेंद्र फडवणीस, बारामती मधून महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार आघाडीवर आहेत.

वाशिम जिल्ह्यात वाशिम शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सिद्धार्थ देवळे, कारंजा मतदारसंघातून भाजप महायुतीच्या सई डहाके, सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ-मालवण मतदारसंघातून महायुतीचे निलेश राणे, सावंतवाडी मधून शिवसेनेचे दीपक केसरकर आघाडीवर आहेत. धुळे शहर मतदारसंघातून भाजपचे अनुप अग्रवाल, यवतमाळ जिल्ह्यात पुसद मतदारसंघात महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे इंद्रनील नाईक, गडचिरोली मतदारसंघातून भाजपचे डॉ. मिलिंद नरोटे, शहादा मतदारसंघात भाजपचे राजेश पाडवी तर आरमोरी मतदारसंघातून भाजपचे कृष्णा गजबे आघाडीवर आहेत. मुंबईतल्या वांद्रे पूर्व मतदारसंघातून तिसऱ्या फेरीअंती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वरुण सरदेसाई, माहिम मतदारसंघातून उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महेश सावंत आघाडीवर आहेत.

****